## निविदा नोटीस क्रमांक-१
## संगणक विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

**Web:- www.zpraigadgov.in E-mail:-mahraizp@nic.in दुरध्वनी क्रमांक:- ०२१४१-२२२३८६**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमधील WIFI चे काम करणेसाठी खालील प्रमाणे पुरवठा दारांकडून दोन मोहरबंद (लाखाने) लिफाफयात निवीदा मागवण्यांत येत आहेत. सदरच्या को-या निविदा 'निविदा कक्ष' अर्थ विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे कार्यालयात सकाळी ११.०० ते दुपारी २.०० चे आत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध करुन दिल्या जातील तसेच सकाळी ११ ते दुपारी २.०० चे आत या वेळेत स्विकारल्या जातील.

| अ.क्र. | तपशिल | नगांची संख्या | एका नगाची अंदाजित रक्कम | अंदाजित रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | अनामत रक्कम रुपये | निविदा फॉर्म मिळण्याचा दिनांक | निविदा फॉर्म स्विकारण्याचा दिवस | निविदा फॉर्मची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | CR250i (Fully Loaded) | १ | ३३००००/- | ३३००००/- | ९.५० हजार | ३८.०० हजार | ८/०४/२००८ ते १०/०४/२००८ | २४/०४/२००८ | ९५०/- |
| 2. | DWL-3200AP | ३८ | ९५००/- | ३६१०००/- | | | | | |
| 3. | Cat6 UTP cable (finolex) 1 Box | १ | ३९५०/- | ३९५०/- | | | | | |
| 4. | DES-3026 | १ | ११५००/- | ११५००/- | | | | | |
| 5. | DES-1016D | ४ | ४५००/- | १८०००/- | | | | | |
| 6. | DWA-G110 usb | १०० | १२९०/- | १२९०००/- | | | | | |
| | | | | Optional | | | | | |
| 7. | DPG-2100 wifi presentation gateway | १ | १२५००/- | १२५००/- | | | | | |
| 8. | DCS-950 ip camera | १ | ११५००/- | ११५००/- | | | | | |
| 9. | Labour charges | - | १०% | ८७७४५/- | | | | | |
| | | | Total Rs.- | ९६५१९५/- | | | | | |

वरील प्रमाणे जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये WIFI चे काम करणेसाठी अटी व शर्तीचा तपशिल जिल्हा परिषदेच्या संगणक कक्षात कार्यालयीन वेळेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे परवानगीने पहावयास मिळतील. निविदा शक्यतो दिनांक २४/४/२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मा.मु.का.अ यांचे परवानगीने उघडण्यांत येतील त्यावेळेस पुरवठादार अथवा त्यांचे प्रतिनिधींना हजर राहता येईल. सदरची इसारा रक्कम The Chief Accounts and Finance Officer, Raigad Zilla Parishad Alibag यांचे नावे डी.डी.काढून तो लखोटा नं.१ मध्ये देणेंत यावा.

सदर नोटीसीतील व निविदा फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती पुरवठादारांवर बंधनकारक राहतील तसेच मुदतीनंतर आलेल्या निवीदांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. या बाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरची निवीदा नोटीस व त्या बाबतच्या अटी व शर्तीचा सविस्तर तपशिल जिल्हा परिषदेच्या www.zpraigadgov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे.

**टीप:-** सदरची निवीदा मंजूर करतांना पुरवठादारांच्या कडील तंत्रज्ञांची / अभियंत्यांची क्षमता व तांत्रिक ज्ञान जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, एन.आय.सी. रायगड-अलिबाग यांचे समवेत बैठक ठेवून तपासून घेण्यांत येईल.

**जा.क्र.राजिप/संगणक कक्ष/४३/२००८**
**दिनांक:- ०३/०४/२००८**
**नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.**

(सही/-जे.आर.तेलखडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

(सही/-गो.रा.बैनवाड)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

(सही/- दिनेश डोके)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

# ‘परिशिष्ठ-अ’

## *रायगड जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमधील WIFI चे काम करणेसाठी अटी व शर्ती*

१. WIFI चे काम पूर्ण झाल्याच्या तारखेपासून १ वर्ष देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादार यंत्रणेची राहिल.

२. संदर्भिय दरकरारातील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून परिशिष्ट-ब मधिल संख्या व विनिर्देशानुसार पुरवठादार यंत्रणेने परिशिष्ट-क मध्ये दर्शविल्यानुसार WIFI चे कामाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत काम पूर्ण करावयाचे आहे.

३. सदरचे कामासाठी खरेदी करण्यांत येणा-या साहित्याच्या उलाढालीच्या किंमतीवर व्यवसाय कर व्हॅट व इतर अनुषंगीक कर पुरवठादार यंत्रणेने शासनास परस्पर अदा करावयाचा आहे.

४. दर करारात नमुद केल्यानुसार विक्रीकर सवलत फॉर्म व जकात करातील सूट बाबत जेथे गरज असेल त्याबाबत या कार्यालयाकडून पुरवठादार यंत्रणेच्या मागणी नंतर उपलब्ध करुन दिले जातील.

५. सदर चे कामासाठी ठरवून दिलेल्या दिवसात काम पूर्ण न केल्यास त्यानंतर संबधित यंत्रणेवर कारवाई करण्यांत येईल.

६. देखभाल व दुरुस्तीबाबत स्थानिक अभियंता यांचे निवासी पत्ता / मोबाईल / निवासी दुरध्वनी क्रमांक या कार्यालयास पुरविणेंत यावेत.

७. WIFI चे कामासाठी वापरण्यांत येणा-या साहित्यामध्ये काही बिघाड निर्माण झाल्यास आपल्या कार्यालयास कळविल्यानंतर त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दुस-या दिवशी यंत्रणेने दुरुस्तीसाठी घेवून जावा व २ दिवसात तो दुरुस्त करुन दयावा व त्याचा दुरुस्ती अहवाल संबधित कार्यालयाचे अधिकारी व बिघाड दुरुस्त करणारे अभियंते यांचे स्वाक्षरीने या कार्यालयास सादर करावा.

८. विनिर्देशाप्रमाणे WIFI चे कामासाठी पुरवण्यांत येणा-या साहित्याची खातरजमा करुन घेण्यासाठी शासनाच्या संबंधित यंत्रणेकडून **(जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी एन.आय.सी. रायगड अलिबाग) यांचे कार्यालयाकडून परिक्षण करुन घेण्यांत येईल. सदरच्या विनिर्देशाप्रमाणे साहित्य पुरवठा न केल्यास संबधित कार्यान्वित संस्थेवर कारवाई करण्यांत येईल.**

९. सदरची निविदा मंजूर करण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना आहे.

१०. सदरची निविदा मंजूरीसाठी कार्यालयीन यंत्रणेवर मी कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा दडपण आणण्याचा अथवा लादण्याचा प्रयत्न करणार नाही.

११. सदरची निविदा नाकारल्यास आपले कार्यालय कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करणार नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

१२. सदरची निवीदा मंजूर करुन आपल्याला कामाचे आदेश दिल्यानंतर काम सुरु करणे पूर्वी १००/- रुपयाचे स्टॅम्प पेपर वर आदेशात दिलेल्या रक्कमेत व मुदतीत काम पूर्ण करुन देईल असे हमीपत्र व १ वर्ष देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी माझी राहिल असे हमी पत्र लिहून दयावे लागेल.

१३. सदरचे काम पूर्ण झाल्यांनतर एन.आ.सी.चे अहवालानंतर आपले ९५% देयक आदा केले जाईल व राहिलेले देयक काम पूर्ण झाल्याच्या दिवसापासून १ वर्षानंतर आदा केले जाईल.

(सही/-जे.आर.तेलखडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

(सही/-गो.रा.बैनवाड)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

(सही/- दिनेश डोके)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग